# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.06.2026** **वार:शनिवार**

1. येत्या 3 वर्षात अंमली पदार्थांचं समूळ उच्चाटन करण्यासाठी देशानं जोरदार लढा उभारल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन
2. मराठी समाजातील युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी सारथीचे उल्लेखनीय कार्य असल्याची मुख्यमंत्र्यांची प्रशंसा
3. छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन आणि
4. राज्यात मोसमी पावसाचा लपंडाव

**अंमली पदार्थ विरोधी लढा**

अंमली पदार्थांच्या व्यसनाचं आव्हान साऱ्या जगाला भेडसावत असून भारतानं त्याविरुद्ध जोरदार लढा उभारल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. अंमली पदार्थ हे देशाच्या सुरक्षेला, सामाजिक स्थैर्याला आणि अर्थव्यवस्थेला आणि विशेषतः युवा पिढीला गंभीर धोका पोचवत असल्याचं त्यांनी सांगितलं. नवी दिल्लीत नार्को-कोऑर्डिनेशन सेंटरच्या दहाव्या बैठकीत बोलताना त्यांनी अंमली पदार्थांविरोधातील लढा पुढील तीन वर्षांत निर्णायक टप्प्यावर पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला. या मोहिमेत सर्व यंत्रणा आणि नागरिकांनी एकत्र येण्याचं आवाहन शाह यांनी केलं. ते म्हणाले...

**मेरा आप सबसे विनम्र आग्रह है कि देश के आने वाले 100 वर्ष के भविष्य के लिए ये लड़ाई हमने जीतनी चाहिए। दृढता के साथ जीतनी चाहिए और हमारे संयुक्त प्रयास से जीती। ये लड़ाई कोई एक विभाग, कोई एक राज्य, कोई एक सरकार, कोई एक व्यक्ति लड़ ही नहीं सकती। इसके लिए सभी सरकारों को एक साथ एक मंच पर आना होगा और सभी सरकारों में सभी विभागों को एक मंच पर आना होगा।**

या बैठकीत भारताला 2029 पर्यंत नशामुक्त करण्याच्या उद्दिष्टाला साध्य करण्यासाठीचा सविस्तर कृती आराखडा गृहमंत्र्यांनी मांडला तसंच तस्करी रोखण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या ऑनलाइन पोर्टल्सची माहिती देत सर्व राज्यांनी माहितीची त्वरित देवाणघेवाण करण्याचे निर्देश दिले. अंमली पदार्थांविरुद्धच्या लढ्यात कार्यरत असणाऱ्या लोकांच्या प्रयत्नांचं शहा यांनी कौतुक केलं. अमली पदार्थ विरोधी दिन काल पाळण्यात आला.

**सारथी-मुख्यमंत्री**

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, उद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संधी उपलब्ध करून देण्याचं धोरण राज्य शासनानं स्वीकारलं असून, या उद्दिष्टासाठी स्थापन झालेल्या सारथी संस्थेच्या माध्यमातून झालेलं कार्य उल्लेखनीय आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

सारथी म्हणजे छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेच्या वतीनं पुण्यात आयोजित विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांच्या सन्मान सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह आदि मान्यवर उपस्थित होते.

नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, लातूर आणि कोल्हापूर इथं सारथीची विभागीय केंद्रे, विद्यार्थी वसतिगृहे आणि प्रशिक्षण सुविधा उभारण्याचं काम सुरू असून पुढील वर्षभरात ही कामं पूर्ण होतील, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. स्पर्धा परीक्षांमध्ये गुणवत्तेनं पात्र ठरूनही जागा कमी असल्यामुळं नोकरी न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'निपुण सेतू' उपक्रम सुरू करण्यात येणार असून अशा विद्यार्थ्यांना खाजगी क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल तसंच त्यांच्या प्रशिक्षणाचा खर्चही राज्य शासन उचलणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. शेती क्षेत्रातही राज्य शासनानं कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'महाविस्तार' ॲप सुरू केलं असून सुमारे 50 लाख शेतकरी त्याचा वापर करत आहेत अशी माहिती त्यांनी दिली. मराठा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी पोहोचविण्यासाठी सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले...

**सगळे समाज आणि आपण सगळे छत्रपतींचे मावळे आहोत. आणि छत्रपतींनी कधीही मावळ्यांमध्ये भेदभाव केला नाही. कुठलाही समाज मागे राहिला तरी देखील आपला जो महाराष्ट्र धर्म आहे, त्या धर्माचं पालन आणि छत्रपती शिवरायांनी जी शिकवण आपल्याला दिली त्या शिकवणीचं पालन आपण करू शकणार नाही. आणि म्हणून या निमित्ताने मी निश्चितपणे, आश्वस्त करतो या ज्या सगळ्या योजना आपण सुरू केलेल्या आहेत आणि मराठा समाजातला हा जो मागे राहिलेला सगळा वर्ग आहे ज्याला खऱ्या अर्थानं आर्थिक आणि शैक्षणिक अशा पद्धतीनं मदतीची आवश्यकता आहे त्याच्या पाठीशी महाराष्ट्राचं सरकार आणि आम्ही सगळे अत्यंत खंबीरपणे या ठिकाणी उभे राहू हा विश्वास मी आपल्याला देतो.**

सारथी ही सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक प्रगती आणि युवा सक्षमीकरणाची प्रभावी चळवळ असल्याचं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितलं. संस्थेच्या उभारणी आणि बळकटीकरणामध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विशेष योगदान असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

## मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरुन मन की बातच्या 135 व्या भागातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. आकाशवाणी, दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, त्यांच्या यूट्यूब वाहिन्या, तसंच न्यूज ऑन एआरआर ॲपवरून मन की बात ऐकता येणार आहे.

## एमपीएससी पूर्वपरीक्षा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्व आगामी पूर्व परीक्षा संगणकाधारित म्हणजेच सीबीटी पद्धतीनं घेण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतल्याची माहिती आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी दिली. परीक्षांतील विलंब कमी करून भरती प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी आयोगानं व्यापक सुधारणा सुरू केल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. ते काल प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

आयोगानं पूर्व परीक्षांचे निकाल 21 दिवसांत जाहीर करण्याचं नियोजन केलं आहे. सीबीटी पद्धतीमुळं परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, जलद आणि कालबद्ध होईल तसंच भरती प्रक्रियेतील विलंब मोठ्या प्रमाणात कमी होऊन उमेदवारांना दिलासा मिळेल, असा विश्वास भीमनवार यांनी व्यक्त केला. सीबीटी पद्धतीचा निर्णय केवळ पूर्व परीक्षांसाठी लागू असेल, असंही त्यांनी यावेळी नमूद केलं.

## शाहू जयंती-कोल्हापूर

राज्यात सर्वत्र काल राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची 152 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कोल्हापुरमध्ये, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचं जन्मस्थळ असलेल्या लक्ष्मी विलास पॅलेस इथं विविध मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केलं. हा दिवस 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त, कोल्हापूर जिल्हा प्रशासन आणि सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग यांच्या वतीनं समता दिंडीसह विविध कार्यक्रमांचं आयोजन

करण्यात आलं होतं. त्याचबरोबर, कोल्हापुरातील राजर्षी शाहू छत्रपती स्मारक भवनाचं नूतनीकरण करून सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री तसंच जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते त्याचं लोकार्पण करण्यात आलं. पिंपरी चिंचवड, सांगली, नाशिकसह राज्यात सर्वत्र सामाजिक न्याय दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

**<u>शाहू पुरस्कार-कोल्हापूर</u>**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे पुरोगामी विचार राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविणारे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉक्टर जयसिंगराव पवार यांना चाळीसावा राजर्षी शाहू पुरस्कार काल कोल्हापूर इथं मरणोत्तर प्रदान करण्यात आला. पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आणि खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार डॉक्टर पवार यांच्या वतीनं त्यांच्या पत्नी वसुधा पवार यांनी स्वीकारला.

**<u>रामनाथ ठाकूर</u>**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी काल पुण्यात 'खेत बचाओ अभियान'च्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. पुण्यातील सर्किट हाऊस इथं झालेल्या बैठकीत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजना, शेतकऱ्यांपर्यंत योजनांचा अधिक व्यापक लाभ पोहोचविण्याचे मार्ग आणि कृषी क्षेत्रासमोरील विविध आव्हानांवर विचारमंथन करण्यात आलं. महाराष्ट्र राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्यासह कृषी विभागातील वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

**<u>सुनेत्रा पवार</u>**

उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी काल श्रीक्षेत्र आळंदी इथं भेट देऊन संत ज्ञानेश्वर माउलींच्या समाधीचं दर्शन घेतलं. त्यानंतर त्यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या विश्वस्तांसोबत बैठक घेऊन संस्थानच्या विविध कामकाजाचा आढावा घेतला. श्रीक्षेत्र आळंदी हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून येथे येणाऱ्या लाखो भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केलं.

**<u>पाऊस</u>**

मोसमी पावसानं राज्यात पदार्पणानंतर काही ठिकाणी दडी मारली आहे. धुळे जिल्ह्यात दोन दिवसातच पावसानं पाठ फिरवली आहे त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. अकोला जिल्ह्यात काल रिमझिम पाऊस झाला. धाराशिव शहर आणि परिसरात काल जोरदार पावसानं हजेरी लावली परंतु खरिपाच्या पेरण्यासाठी आणखी मोठ्या पावसाची आवश्यकता आहे. बुलढाणा जिल्ह्यात पेरणीयोग्य पाऊस झाल्यानं जळगाव जामोद तालुक्यातील सुनगाव परिसरात पेरणीला प्रारंभ झाला आहे. अल निनोचा प्रभाव लक्षात घेता शेतकऱ्यांनी कशी काळजी घ्यावी याबाबत जिल्हा कृषी प्रशासनाकडून विविध तालुक्यात कार्यशाळा घेतल्या जात आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात विश्रांतीनंतर काल सकाळी पावसानं हजेरी लावली.

**<u>हवामान</u>**

येत्या आठवड्यात राज्यभरात सर्वत्र कमी अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात 30 जूनपर्यंत पावसाचा जोर असेल आणि किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. विदर्भातही बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.